पीएच. डी.

संशोधन आराखडा

“उस्मानाबाद जिल्ह्यातील पशुधन वितरणाचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

भंडारे माधव मारोतीरेड्डी

(एम.ए., बी.एड., एम.फिल. (भूगोल)

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.सदानंद हरिबा गोने

उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी

ता. जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

मार्च, २०१६

“उस्मानाबाद जिल्ह्यातील पशुधन वितरणाचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :

पशुधन हा मानवी जीवनावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा नैसर्गिक घटक आहे. प्राचीन काळात मानवाने उदरनिर्वाहाकरिता पशुपालन हा व्यवसाय सुरू केला व नंतर काळाच्या ओघात मानवाने पशुपालन हा व्यवसाय वेगवेगळ्या उद्देशाने करू लागला. यामध्ये शेतीकामे, वाहतूक, मांस, अन्न, व्यापार, कातडी, लोकर, दूध इत्यादी उत्पादनासाठी करू लागला. वर्तमानकाळात पशुधनास एक महत्त्ववाची नैसर्गिक साधनसंपत्ती असे संबोधले जाते.

भारतीय संस्कृतीत पशुधनास विशेष महत्त्व आहे. म्हणजे विविध सण-उत्सवाच्या वेळी बैल, गायी, म्हैस, उंटे इत्यादी प्राण्यांची पूजा केली जाते. भारतात मोठ्या प्रमाणात पशुधनाची विविधता आहे व त्याचे मानवी जीवनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व पर्यावरणीय महत्त्व लक्षात येते.

शेती अर्थ व महत्त्व :

प्राचीन काळातील मेसोपोटेमिया (तैग्रीस व युफ्राटीस खोरे), मेक्सिको (तेहकिन खोरे), इजिप्त (नाईल खोरे), मोहेंजोदारो व हडप्पा (सिंधू खोरे) आणि चीन (हो-यांग-हो खोरे) याठिकाणी मानवी संस्कृतीबरोबरच शेतीचा व्यवसायाचा विकास झाला आहे.

शेती हा शब्द लॅटिन Agriculture या शब्दापासून बनला आहे. Agri या शब्दाचा अर्थ मृदा किंवा शेत आणि Culture या शब्दाचा अर्थ लागवड असा आहे.

Mc Carty H.H. “Agriculture is defined as the purposeful tending of crops and animals.”

“पिकांचे आणि पशुंचे उद्देशानुरूप केलेली देखभाल म्हणजे कृषी होय.”

कृषी हा मानवाचा प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. कृषी म्हणजेच जमिनीची मशागत करून बि-बियाणांची पेरणी करणे व पिकांची नीट काळजी घेऊन उत्पादन वाढविणे तसेच पशुपालन करणे यास कृषी किंवा शेती असे म्हणतात. परंतु जगात शेतीची सुरुवात नेमकी कधी झाली याबाबत अनेक मत-मतांतरे आहेत. परंतु शास्त्रज्ञाच्या मते शेतीची सुरुवात ही

इ.सन. पूर्व १२०० मध्ये झाली आहे. तरी परंतु त्याअगोदर पृथ्वीवर मानवाने पशुपालन व्यवसाय आरंभ केल्याचे काही पुरावे शास्त्रज्ञांनी सांगितले आहेत. तसेच नंतरच्या काळात मानवाने उपलब्ध पशुंचा कृषीसाठी व वाहतुकीसाठी वापर केला गेला आहे. शेतीतून मानवाला अन्न, वस्त्र, निवारा यासोबत उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चा माल उत्पादित केला जातो. म्हणून आधुनिक काळात मानवी जीवनाच्या दृष्टीने शेती व्यवसाय एक महत्त्वपूर्ण व्यवसाय म्हणून उदयास आलेला आहे.

पशुधनाचा अर्थः

पशुधनाची माहिती पाहत असताना पशुधन म्हणजे काय? हे समजून घेणे आवश्यक आहे. पशुधन शब्द पशु+धन असा विभागला असून त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे

पशु : जनावर, निरबुद्ध किंवा अविचारी

धन : पैसा, संपत्ती किंवा द्रव

पशुधनाचे महत्त्व :

१. शेती कसण्यासाठी पशु हा महत्त्वाचा घटक आहे.

२. पशु साधनापासून मानवाला वेगवेगळे व्यवसाय करता येतात.

३. पशुच्या शेणखतापासून शेतीला सेंद्रीय खताचा पुरवठा होतो.

४. मानवाची अन्नाची गरज भागवण्यासाठी पशूचा उपयोग करण्यात येतो.

५. घरातील गोबरगॅससाठी पशुंच्या शेणाचा वापर करण्यात येतो.

६. मानवाला दुध व दुग्धजन्य पदार्थांसाठी म्हैस व गाय हे पशूधन महत्त्वाचे आहे.

७. पशुधनामुळे पर्यावरणीय संतुलन राखता येते.

८. औषध निर्मितीसाठी पशुचा उपयोग केला जातो.

१.२ अभ्यासक्षेत्र :

उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिणेस असून महाराष्ट्रातील औरंगाबाद या प्रशासकीय विभागात हा जिल्हा येतो. या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३५’ उत्तर अक्षवृत्त ते १८°४०’ उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे. तर रेखावृत्तीय विस्तार ७५°१६’ पूर्व रेखावृत्त ते ७६°४०’ पूर्व रेखावृत्तादरम्यान आहे.

उस्मानाबाद जिल्ह्याची पूर्व-पश्चिम लांबी २८२ कि.मी. असून दक्षिण-उत्तर लांबी २०४ कि.मी. आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेस लातूर जिल्हा, पश्चिमेस सोलापूर जिल्हा, वायव्येस अहमदनगर जिल्हा, उत्तरेस बीड जिल्हा, दक्षिणेस सोलापूर जिल्ह्याचा काही भाग व कर्नाटक राज्यातील बिदर व गुलबर्गा हे जिल्हे आहेत.

१.३ उद्दिष्ट्ये :

पशुधनावर अनेकविध घटकांचा परिणाम होत असल्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पशुंचे वितरण कमी-जास्त असल्याचे दिसून येते. पशुपालनावर हवामान, चारा उपलब्धता, पाणी पुरवठा, बाजारपेठ, वाहतूक-दळवळण इत्यादी घटकांचा परिणाम होतो.

वरील घटक विचारात घेऊन उस्मानाबाद जिल्ह्यातील पशुधनाचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्ट्ये ठेवलेली आहेत.

१) अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक, आर्थिक व सामाजिक घटकांचा अभ्यास करणे.

२) पशुधन प्रकाराचा अभ्यास करणे.

३) पशुधन वितरणाचा व त्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४) पशुधनापासून मिळणाऱ्या उत्पादनाचा व आर्थिक उत्पन्नाचा अभ्यास करणे.

५) पशुवैद्यकीय सुविधांचा आणि पशुसंवर्धन केंद्राचा अभ्यास करणे.

६) जिल्ह्यातील पशुधन बाजारपेठांचा अभ्यास करणे.

७) पशुधन वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.

१.४ गृहितके :

१) उस्मानाबाद जिल्ह्यात पशुधनाचे अनेक प्रकार आढळतात.

२) पशुधनाच्या वितरणात तालुकानिहाय असमतोलपणा आहे.

३) जिल्ह्यात पशुधनामुळे आर्थिक व सामाजिक सुधारणा झाली आहे.

४) जिल्ह्यात पशुधनासाठी आवश्यक पशुवैद्यकीय सुविधा नाहीत.

५) पशुधन योजनांचा लाभ, पशुपालकांना झालेला नाही.

६) जास्तीत जास्त संख्येने पशुधनाचे जतन केल्यास शेती उत्पादकता वाढविण्यासाठी फायदा होईल.

१.५ आकडेवारीचे संकलन :

प्रस्तुत अभ्यासासाठी १९९१ ते २०११ या कालावधीतील सांख्यिकीय माहिती ही प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची वापरण्यात येणार असून त्यातील प्राथमिक माहिती ही पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, प्रत्यक्ष भेट अहवाल, तालुका पशु चिकित्सालय व पशुसंवर्धन कार्यालय येथून तर दुय्यम स्वरूपाची सांख्यिकीय माहिती ही गॅझेट, जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन अहवाल येथून उपलब्ध करून घेतली जाईल. उपलब्ध झालेल्या सांख्यिकीय माहितीचा वापर वेगवेगळया संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करुन करण्यात येईल.

१.६ अभ्यास पद्धती :

उस्मानाबाद जिल्ह्यातील पशुधन वितरणाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची माहिती वापरण्यात येणार असून त्याआधारे जिल्हयातील पशुधन बदल व केंद्रीकरण स्पष्ट करण्यासाठी खालील संख्याशास्त्रीय पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

पशुधनातील वाढ व घट काढण्यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

पशुधनाची वाढ = नंतरची पशुजनगणना - अगोदरची पशुजनगणना

त्याचप्रमाणे **भाटिया एस.एस.** यांच्या (1965) सुत्रानुसार पशुधन केंद्रीकरण निर्देशांक काढण्यात येणार आहे.

सुत्र $$X = \frac{s}{t} \div \frac{S}{T}$$

X = पशुधन केंद्रीकरण निर्देशांक

s = तालुक्यातील विशिष्ट पशूंची संख्या

t = तालुक्यातील एकूण पशुधनाची संख्या

S = उस्मानाबाद जिल्ह्यातील विशिष्ट पशूंची संख्या

T = उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण पशुधनाची संख्या

तसेच पशुधनाची घनता काढण्यासाठी चतुर्थक विचलन या सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

याशिवाय नकाशा, आलेख, आकृत्यांच्या आधारे माहिती दाखविण्यात येईल.

१.७ विषय निवड :

पशुधनाचा मानवी जीवनाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध असल्याने पशुंचे मानवी जीवनाच्या दृष्टीने अनन्यासाधारण महत्त्व आहे. प्रस्तुत जिल्ह्यात पशुधन एक महत्त्वाची साधनसंपत्ती असल्याने त्यांची तालुकानिहाय विविधता पाहणे आवश्यक आहे. म्हणून हा विषय निवडला आहे.

१) उस्मानाबाद जिल्हा पशुधनाच्या बाबतीत समृद्ध असा जिल्हा असल्याने तेथील पशुधनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करण्याची आवड असल्याने हा विषय निवडला आहे.

२) पशुधन व मानवी जीवन यांचा परस्परसंबंध असून या पशुधनाचा मानवी जीवनावर कसा परिणाम झालेला आहे हे पाहण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

३) जिल्ह्यातील तालुकानिहाय विभिन्न पशुधन वितरणातील भिन्नता लक्षात घेण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

४) जिल्ह्यातील पशु बाजारपेठ विशेष शेळी पशुपालनासाठी उल्लेखनीय असल्यामुळे त्याची माहिती मिळविण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

वरील प्रकारची पशुधन वितरणातील विविधता उस्मानाबाद जिल्ह्यात दिसून येत असल्याने पशुधनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१.८ साहित्याचे पुनरावलोकन

पशुपालन व्यवसाय प्रदेशानुसार भिन्न स्वरूपाचा दिसून येतो. त्याचा उपयोग प्रस्तुत संशोधन कार्य करताना उपयोगाचे ठरणार आहे.

१) अल्फ्रेड रूसेल (१८७६) यांनी 'प्राण्यांचे भौगोलिक वितरण' नावाचे पुस्तक लिहिले आहे.

२) एस.डी. शिंदे (१९७४) 'कोकणाचा कृषी भूगोल' या अभ्यासात पशुधन, पीक संयोग, भूमी उपयोग इत्यादींचा अभ्यास केला आहे.

३)	मासा नोबो फुकुओका (१९८०) यांनी ‘शेतीचे नवे तंत्रज्ञान’ या ग्रंथात पाळीव प्राण्यांनी विसर्जीत केलेले मलमूत्र आणि नैसर्गिक शेती यावर संशोधन केले तेव्हापासून खऱ्या अर्थाने नैसर्गिक शेतीमध्ये पाळीव प्राण्यांचे महत्त्व स्पष्ट झाले.

४)	बिरादार शैला यांनी ‘जळगाव जिल्ह्यातील सहकारी दूध उत्पादक संघाचा विश्लेषणात्मक अभ्यास’ या संदर्भातील केलेले संशोधन प्रस्तुत अभ्यासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

५)	एच.बी. राठोड (२००१) यांनी ‘Spatio-temporal analysis of Agricultural landuse in Beed District : A Geographical Review’ या अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी पशुधनाच्या योगदानाचा अभ्यास केला आहे.

६)	एम.एच. गिलबिले (२००७) यांनी ‘उस्मानाबाद जिल्ह्यातील सहकारी दुग्ध विकासाचा अभ्यास’ केलेला आहे.

७)	कटके अर्जुन केशव (२००९) यांनी ‘औरंगाबाद जिल्ह्यातील पशुपालनाचे भौगोलिक विश्लेषण’ हा प्रबंध सादर केला आहे.

१.९ प्रकरण योजना

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यासक्षेत्र

१.३ विषय निवड

१.४ उद्दिष्ट्ये

१.५ गृहितके

१.६ माहितीचे संकलन

१.७ अभ्यास पद्धती

१.८ साहित्य पुनरावलोकन

प्रकरण दुसरे - उस्मानाबाद जिल्ह्याची भौगोलिक, आर्थिक व सामाजिक स्थिती

२.१ स्थान

२.२ प्राकृतिक रचना

२.३ नदीप्रणाली

२.४ हवामान

२.५ मृदा

२.६ जलसिंचन

२.७ वाहतूक-दळणवळण

२.८ उद्योगधंदे

२.९ लोकसंख्या

प्रकरण तिसरे - पशुधनाची वाढ व वितरण

३.१ प्रस्तावना

३.२ पशुधनाची वाढ

३.३ पशुधनाचे तालुकानिहाय वितरण

३.४ पशुंचे स्थलांतर (खरेदी-विक्री, मांस, दूध)

प्रकरण चौथे - पशुधनापासून मिळणारी उत्पादने

४.१ दूध

४.२ मांस

४.३ कातडी

४.४ लोकर

४.५ खत-बियाणे

४.६ पशुंचे बाजारपेठ

४.७ पशुंचा इतर उपयोग

४.८ पशुवैद्यकीय सुविधा

प्रकरण पाचवे - पशुधन व पशुउत्पादनाच्या योजना

५.१ शासकीय योजना

५.२ सेवाभावी योजना

५.३ सहकारी योजना

प्रकरण सहावे - निष्कर्ष व उपाययोजना

६.१ निष्कर्ष

६.२ उपाययोजना

संदर्भ ग्रंथ सूची

१) पशुसंवर्धन सांख्यिकी पुस्तिका (१९९०-२००५)

२) डॉ.दिवाकर कुलकर्णी व नितीन मार्कण्डेय (१९९७), ठाणबद्ध पद्धतीसह सविस्तर शेळीपालन, रेणूका प्रकाशन, परभणी

३) ह.भ. भावे (१९९७), शिकार ते शेती, प्रकाशक ह.भ.भावे, पुणे

४) डॉ.नितीन मार्कण्डेय (२०००), दुध व्यवसाय इस्त्राईलचा, रेणुका प्रकाशन, परभणी

५) डी.एस. सूर्यवंशी (२००३), पश्चिम खान्देशातील पशुपालनाचे भौगोलिक विश्लेषण, महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका

६) कटके अर्जुन केशव (जून २००९) औरंगाबाद जिल्हा पशुपालन भौगोलिक विश्लेषण

७) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, उस्मानाबाद जिल्हा

८) भारतीय जनगणना अहवाल, १९९१ ते २०११

9) T.S. Chavan (1987), Agricultural Geography, Academic Publishers, Jaipur.

10) Prof.Savadi A.B. ‘The Megastate Maharashtra’, Pp.25, 26, 39

11) The Encyclopedia District Gazetteers of India.

12) www.osmanabad.nic.in

संशोधक
भंडारे माधव मारोतीरेड्डी
श्री हावगीस्वामी महाविद्यालय,
उदगीर ता.उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.सदानंद हरिबा गोने
उज्वल ग्रामीण महाविद्यालय,घोणसी
ता.जळकोट जि.लातूर